बालसंगोपन योजनेसाठी स्वयंसेवी संस्थांना सहायक अनुदान वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक-बीजीटी-२०१९/प्र.क्र.४४/का-०८

नविन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख-२९ मे, २०१९.

वाचा :-

१. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.०१ एप्रिल, २०१९.

शासन निर्णय :-

मागणी क्र.एक्स ०१, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण,०२, समाजकल्याण, १०२, बाल कल्याण, (१५) बाल संगोपन योजना (संगोपन व काळजी), (१५) (०१) बालसंगोपन योजनेसाठी स्वयंसेवी संस्थांना सहायक अनुदान (कार्यक्रम) (२२३५ बी ९०६) या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० या वित्तीय वर्षासाठी महिला व बाल विकास विभागांतर्गत बालसंगोपन योजनेसाठी सहायक अनुदान (वेतनेतर) या बाबींसाठी ₹३१२३.८४ लक्ष इतकी तरतूद अर्थसंकल्पित आहे. एप्रिल, २०१९ ते जुलै, २०१९ या चार महिन्याचा खर्च भागविण्यासाठी महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) विधेयक, २०१९, दि.८.३.२०१९ च्या अधिसूचनेन्वये प्रसिध्द करण्यात आले आहे. सदर लेखानुदानाच्या अनुषंगाने सदर शासन निर्णयाव्दारे महिला व बाल विकास विभागांतर्गत बालसंगोपन योजनेसाठी सहायक अनुदान (वेतनेतर) या बाबीसाठी आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांना रकाना क्र.३ प्रमाणे एकूण **₹३३६.६५ लक्ष** इतका उद्दिष्टनिहाय निधी खालीलप्रमाणे वितरीत करण्यात येत आहे.

(रुपये लक्ष)

उद्दिष्ट	अर्थसंकल्पित अंदाज	प्रस्तावित वितरण
(१)	(२)	(३)
३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)	१७००.००	६३६.६५
एकूण	**१७००.००**	**६३६.६५**

२. सदर योजनेसाठी यापूर्वी वितरीत उपलब्ध केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र विहीत तपशीलासह संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडून उपलब्ध करुन सदर शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेला निधी संबंधितांना वितरीत करण्याची दक्षता घेण्यात यावी.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.१ एप्रिल, २०१९ रोजीच्या परिपत्रकातील परिच्छेद क्र.५ ते १७ मधील मार्गदर्शक सूचना व त्या विभागाने दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०५२९१७३३४५७१३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Lalsing Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, serialNumber=4ca059ab7b8d64aaf749fe58e0a714a015f521cb28fd2204e49a4d81f12a5745, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2019.05.29 17:36:40 +05'30'

(ला.रा.गुजर)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष/ सदस्य, विधानसभा/ विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. मा.मंत्री/ राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांची खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे
९. महालेखापाल- महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
१०. महालेखापाल- महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर
११. सर्व उपसचिव, सर्व अवर सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. उपायुक्त (बाल विकास), महिला व बाल विकास आयुक्तालय,पुणे
१३. कक्ष अधिकारी, वित्त विभाग (व्यय-६/ अर्थसंकल्प-७), मंत्रालय, मुंबई
१४. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सदर निधी बी.डी.एस. प्रणालीवर वितरीत करण्याच्या विनंतीसह अग्रेषित.
१५. सर्व कार्यासने, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. निवड नस्ती, का-०८.